झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

# नोटीस

००/2018/13107

जा.क्र.झोपुप्रा/उजि/भूसंपादन/प्र.क. १०/२०१८/

दिनांक :- 20 OCT 2018

प्रति,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जमिन मालक -<br>१) मॅनेजर मामलेदार बोरीवली<br>२) गोवर्धणदास लिलाधर<br>३) नरोत्तम मथुरादास<br>मौजे- कांदिवली, ता- बोरीवली<br>न.भु.क्र. ११३६, ११३७ (पै),<br>रामजी लल्लू कंम्पाऊंड, एम.जी.रोड,<br>कांदिवली (प), मुंबई- ६७ | २. | जमिन मालक -<br>रतनजी रुस्तमजी<br>मौजे- कांदिवली, ता- बोरीवली<br>न.भु.क्र. ११३८ (पै)<br>रामजी लल्लू कंम्पाऊंड, एम.जी.रोड,<br>कांदिवली (प), मुंबई- ६७ |

**विषय :-** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१, चे कलम १४(१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी जमिन संपादीत करणेबाबत मौजे. कांदिवली, ता. बोरीवली येथील न.भु.क्र. ११३६, ११३७ (पै), ११३८ (पै) या मिळकतीवरील श्रीजी सह. गृह. संस्था (नि)

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १५/०६/२०१७ असाधारण भाग चार-ब, असाधारण क्र. १५७, अधिसूचना क्रमांक भूसंपा- २०१६/प्र.क्र.६९/झोपनि-२ दि. १५/०६/२०१७
२) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक. भुसंपा-२०१६/प्र.क्र.६९/झोपनि-२, दि. १७/०६/२०१७

मौजे. कांदिवली, ता. बोरीवली येथील न.भु.क्र. ११३६, ११३७ (पै), ११३८ (पै) या मिळकतीवरील ३३०२.२ चौ.मी. क्षेत्र श्रीजी सह.गृह.संस्थेंची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम १४ (१) नुसार भूसंपादन प्रस्ताव शासन मंजूरीसाठी प्राधिकरणाकडून दि.२९/०३/२०१६ रोजी शासनास अहवाल सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासन मंजूरी मिळून शासन गृहनिर्माण विभागाकडून संदर्भ क्र.१ दि.१५/०६/२०१७ नुसार भूसंपादन अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली आहे व सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी संदर्भ क्र.२ दि.१७/०६/२०१७ चे पत्राने प्राधिकरणास प्राप्त झाले आहे.

मौजे. कांदिवली, ता. बोरीवली येथील न.भु.क्र. ११३६, ११३७ (पै), ११३८ (पै) या मिळकतीमधील ३३०२.२ चौ.मी क्षेत्र श्रीजी सह. गृह. संस्था (नि), एम.जी.रोड, कांदिवली, बोरीवली (प), मुंबई- ६७ या संस्थेसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम १४(१) मधील तरतुदीनुसार शासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.भूसंपा-२०१६/प्र.क्र.६९/ झोपनि-२ दि.१५/०६/२०१७ अन्वये भूसंपादीत होवून राज्य शासनाकडे पुर्णपणे निहीत झालेले आहे.

शासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२ - २६५९०५१९ / ०४०५ / १८७९ / ०९९३ फॅक्स - ९१ - २२ - २६५९०४५७

प्रस्तुत प्रकरणी एकूण ५ वर्षाचे मासिक भाडे **रक्कम रु १,८५,८३,२४३** /- (अक्षरी- एक कोटी पंच्याऐंशी लाख त्र्याऐंशी हजार दोनशे त्रेचाळीस रुपये मात्र) त्यापैकी ६०% म्हणजे रुपये **१,११,४९,९४६/-** (अक्षरी- एक कोटी अकरा लाख एकोणपन्नास हजार नऊशे सेहेचाळीस मात्र) (४०% रक्कम ही करपात्र) एवढी नुकसान भरपाईची रक्कम ठरविणेत येत आहे.

तरी वरील प्रमाणे संपादीत झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम **१,११,४९,९४६/-** (अक्षरी- एक कोटी अकरा लाख एकोणपन्नास हजार नऊशे सेहेचाळीस मात्र) आपणांस मान्य आहे किंवा कसे व मान्य नसल्यास उक्त जमिनीपासून प्रत्यक्ष मिळालेली निव्वळ सरासरी उत्पन्न म्हणून जमीन मालक म्हणून आपणाकडून कोणत्या रक्कमेची मागणी आहे. याबाबतचे लेखी निवेदन या कार्यालयास पुढील १५ दिवसांत सादर करावे. त्याअनुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचेसमोर सुनावणी ठेऊन आपली बाजू ऐकून घेतली जाईल.

वर नमूद केलेल्या मुदतीत आपणाकडून लेखी निवेदन प्राप्त न झाल्यास या कार्यालयाने वरील प्रमाणे निश्चित केलेली नुकसान भारपाईची रक्कम आपणांस मान्य आहे असे गृहीत धरुन निवाडा घोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

18/9/18

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**, करीता

**स्थळ :- वांद्रे (पूर्व), मुंबई**
**दिनांक :- / /२०१८**